शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ७९/२०१९

श्री. मनोहर शंकर ककमरे — तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. पद्‌मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली.

२. डॉ.व्ही.पी. शेतकरी शिक्षण मंडळ, पद्‌मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली. (संस्था)

— वि. प.

पद्‌मभूषण वसंतरावदादा पाटील इन्सि. ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव, ता.मिरज, जि.सांगली. यांचेकडील शिक्षक श्री. मनोहर शंकर ककमरे यांनी दि.१८/१०/२०१९ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

रविवार दि.०५/०८/२०१८ रोजी संस्थेच्या अध्यक्षांनी रेग्युलर स्टाफची मिटींग बोलावली होती. मी त्या मिटींगमध्ये होतो परंतू अंदाजे सायंकाळी पाचच्या दरम्यान माझ्या छातीत दुखू लागल्याने घरी परतलो. या गोष्टीचा विनाकारण विपर्यास करून मला वारंवार प्राचार्य व कॉलेज कमिटी चेअरमन यांनी बोर्डरूममध्ये बोलावून अपमानास्पद वागणूक देवून माझ्याकडून राजीनाम्याची मागणी केली. माझी आई खूप आजारी होती आणि बरेच दिवस दवाखान्यात ॲडमिट होती. मुलगा व मुलगी यांची जबाबदारी, घर कर्जाचा हप्ता, इंन्शूरन्स हप्ता व इतर जबाबदारी असल्याने कृपा करून राजीनामा मागू नका, मला नोकरीची सक्त गरज आहे, असे सांगितले. तरीसुध्दा माझे बरेचसे पगार अडवले आहेत.

माझे शिकवणे चांगले आहे व विद्यार्थ्यांनी दिलेला फिडबॅकसुध्दा उत्कृष्ट आहे. मी शिकवत असलेल्या विषयाचा निकालसुध्दा ९० टक्के पेक्षा जास्त लागला आहे. तरीही मला तुम्ही दुस-या कॉलेजवर नोकरी बघा, इथे राजीनामा द्या असे ऐकवण्यात आले. अनेक वेळा अडवलेल्या पगारासाठी विनंती अर्ज देवूनसुध्द्‌ा पगारासंदर्भात कोणतीही चर्चा न करता सतत हो करतो अशी नाटकी आश्वासने

देवून, कारणे दाखवा नोटीस देत होते. इथून काढून टाकण्याची भीती घालून, पगार अडवून, थंब इंप्रेशन बंद करून, माझ्या केबिनला कुलूप घालून माझा मानसिक व आर्थिक छळ केला जात होता. माझ्या शैक्षणिक कामात मी कुठलाही हलगर्जीपणा केव्हाही केलेला नाही.

दि.१५/०७/२०१९ रोजी मला प्राचार्यांनी निलंबनाच्या आदेशाचे पत्र दिले. निलंबनाच्या काळात संस्थेने कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत किंवा भत्ता दिला नाही व अडवलेले पगारसुध्दा अदा केले नाहीत. निलंबन आदेश दिलेल्या तारखेपासून ९० दिवस उलटून गेले, तरीदेखील मला कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी बोलावले नाही तसेच माझी बाजू मांडण्याची संधी दिली गेली नाही. अशा प्रकारे माझी आर्थिक व मानसिक हेळसांड करीत आहेत.

विद्यापीठाचे नियमानुसार माझी प्राथमिक चौकशी करणे आवश्यक होते व प्राथमिक चौकशीत दोषी आढळल्यानंतर माझे निलंबन केले गेले पाहिजे होते. परंतु माझी कोणतीही प्राथमिक चौकशी झाली नाही आणि माझ्या हातून कोणतेही गुन्हेगारीचे अक्षम्य कृत्य झालेले नाही तरीही सदर महाविद्यालयाचे प्राचार्यांनी मला निलंबित केले आहे. मला महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी निलंबित करण्याचे कोणतेही अधिकार नाहीत त्यामुळे सदर निलंबनाचा अधिकार हा नियमबाहय आहे, परिणामी तो रद्द होण्यास पात्र आहे. त्यामुळे माझे करण्यात आलेले निलंबन सत्वर रदद करण्यात यावे. निलंबनाचा काळ हा सेवा काळ समजून या काळातील सर्व वेतन व भत्ते ताबडतोब देण्याचे सर्व संबधितांना आदेश व्हावेत ही विंनती. मला नोकरीची सक्त गरज असून, यापुढेही अत्यंत प्रामाणिकपणेच ती मी करेन.

या तक्रारीव्द्वारे मी सर्व तक्रार निवारण समिती सदस्यांना विनंती करतो की, माझे निलंबन रद्द करून व अडविलेले पगार (माहे मे २०१८, जुन २०१८ ऑगस्ट २०१८ ऑक्टोंबर २०१८ ते आजपर्यंत) व निलंबन काळातील पगार तात्काळ करणेत यावा याविषयी संबधितांना सूचना द्यावी ही विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

१. संबधित शिक्षकास बोलता येत नाही. कोणताही शब्द न उच्चारता फक्त फळयावर लिहीत असतात.
२. दिलेला कार्यभार पुर्ण घेत नाहीत. विद्यार्थी नाहीत या सबबीखाली कामचुकारपणा करतात.
३. संशाधनाचे कोणतेही काम केलेले नाही. स्वताःचे असे कोणतेही संशोधन काम नाही. महाविद्यायामधील इतर कोणतीही जबाबदारी पेलण्यास असमर्थ आहेत.
४. नाविन्यपूर्ण कोणताही उपक्रम राबविलेला नाही. नविन सॉप्टवेअर्स शिकलेले नाहीत.
५. महाविद्यालयाच्या कामकाजाच्या दृष्टीने निरूपयोगी आहेत.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. शारिरिक व मानसिक दृष्टया अनफिट आहेत. वैद्यकिय उपचार सुरू आहेत.

२. संस्थेच्या पदाधिका-यांबरोबरचे वर्तन अयोग्य आहेत. शिष्टाचार माहित नाहीत.

३. चर्चेला बोलाविले तरीही प्रतिसाद देत नाहीत.

४. खोटे आरोप करतात. मानसिक आजारी असल्याचा गैरफायदा घेतात.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी निलंबन आदेश रदद् करणे व माहे मे २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते अर्ज दाखल तारखेपर्यंत महाविद्यालयाने अडवलेले पगार मिळावेत अशी तक्रार अर्जात नमूद केली आहे.

या प्रकरणी समितीसमोरील सुनावणीदरम्यान संस्था व महाविद्यालयाकडून तक्रारदार हे महाविद्यायातील कामकाज व्यवस्थित करत नसल्याने त्यांचे पगार अडविणेत आल्याचे समितीस कथन केले. परंतू तक्रारदार हे महाविद्यालयातील कामकाज व्यवस्थित करत नसलेबाबतचे कोणतेही लेखी पुरावे अगर सबळ कारण संस्था व महाविद्यालयास समितीसमोर सादर करता आलेले नाही. सबब समितीने तक्रारदार यांचा पगार नियमाने अडविला जावू शकत नसल्याचे संस्था व महाविद्यालयाच्या निदर्शनास आणून दिले व तक्रारदार यांचे रोखण्यात आलेले पगार देण्यात यावेत अशी सुचना केली.

समितीसमोर तक्रारदार यांनी संस्था, महाविद्यालयाने दि.१७/०३/२०२० रोजीच्या आदेश पत्राने आपले निलंबन मागे घेतल्याची माहिती दिली. तसेच संस्था महाविद्यालयानेही तक्रारदार यांचे निलंबन मागे घेण्यात आल्याचे सांगून तक्रारदार यांचे अडवलेले पगार जुलै, २०२० पासून सुरू केल्याचे समितीस कथन केले. तसेच तक्रारदार यांनीही महाविद्यालयाकडून जुलै, २०२० पासून पगार सुरू करण्यात आल्याचे समितीसमोर सांगितले. सबब तक्रारदार यांचे निलंबन संस्थेने मागे घेतले असलेने तक्रारदार यांच्या रोखलेल्या थकीत पगाराबाबतचा मुद्या समितीकडून विचारार्थ घेण्यात आला.

१. समितीने तक्रारदार यांचे रोखलेले पगार अदा करण्याची सुचना संस्था व महाविद्यालयास केली होती. या अनुषंगाने संस्थेने समितीसमोर सादर केलेल्या लेखी खुलाश्यातील तपशिलामध्ये तक्रारदार यांच्या दि.१५/०७/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या निलंबन काळात त्यांना ५० टक्के वेतन देय होत असल्याचे नमूद करून तक्रारदार यांच्या मे, २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते दि.३० जून २०२० या कालावधीतील थकीत वेतनाची एकुण रक्कम रू. २४,५९,२३३/- इतकी असून त्यापैकी दि.२१/०१/२०२० रोजी रू.५,००,०००/- इतकी देण्यात आल्याची माहिती दिली. तसेच

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

समितीसमोर दिलेल्या दि.२३/०८/२०२१ रोजीच्या पत्रातील लेखी खुलाश्यात तक्रारदार यांना दि.२३/०८/२०२१ रोजी रू.३,९१,८४५/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली असून तक्रारदार यांनी स्टॅटयुट नुसार निलंबन कालावधीत इतरत्र कुठेही काम करत नसल्याचे प्रमाणपत्र महाविद्यालयाकडे सादर करणे आवश्यक होते. तसे प्रमाणपत्र त्यांनी सादर केले नसल्याने ते निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र नसल्याचे व तसे त्यांना पत्राने कळविणेत आल्याचे म्हटले आहे तसेच तक्रारदार यांच्या दि.१५/०७/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या निलंबन काळातील निर्वाह भत्याबाबत समितीला दि.१३/०८/२०२१ रोजी दिलेल्या पत्रामध्ये नजरचुकीने व अनवधानाने सदर हिशोबामध्ये निर्वाह भत्याची रक्कम धरण्यात आलेली आहे. सदर तपशिलापोटी धरलेली रक्कम श्री.ककमरे यांना पुढील वेतन अदा करतेवेळी कपात करण्यात येणार आहे असे नमूद केले आहे.

याबाबत तक्रारदार यांनी समितीसमोर थकीत वेतानाच्या रक्कमेपोटी संस्था व महाविद्यालयाकडून रू.८,९१,८४५/- इतकी रक्कम मिळाल्याचे मान्य केले तसेच आपण निलंबन काळात इतरत्र काम करत नसल्याचे प्रमाणपत्र महाविद्यालयाकडे दि.१५/०६/२०२२ रोजी दिल्याचे सांगून निलंबन काळातील आपल्या पुर्ण पगारासह उर्वरीत थकीत वेतनाची रक्कम मिळावी अशी मागणी केली.

उपरोक्त मुद्याबाबत समितीचे मत असे की, संस्थेने तक्रारदार यांचे दि.१५/०७/२०१९ ते दि.१७/०३/२०२० या काळात निलंबन केले होते. परिनियमातील तरतूदीनुसार निलंबन काळात निलंबित शिक्षकास निर्वाह भत्ता देणे बंधनकारक असताना संस्थेने सदर तक्रारदार यांना निलंबन काळात कोणत्याही प्रकारचा निर्वाह भत्ता दिल्याचे समितीच्या निदर्शनास आलेले नाही. तसेच निलंबन काळात संस्थेने तक्रारदार यांची कोणत्याही प्रकारची चौकशी केल्याची कागदपत्रे समितीसमोर आलेली नाहीत. तक्रारदार यांचे निलंबन हे कायदेशीर योग्य मार्गाने झालेले नसल्याचे समितीच्या निर्देशनास येते. तसेच सदरचे निलंबन संस्थेने विनाचौकशी मागे घेतले असल्याने तक्रारदार यांना निलंबन काळातील पुर्ण पगार देणे संस्थेस बंधनकारक आहे.

२. संस्थेने समितीसमोर सादर केलेल्या दि.३०/१०/२०२१ रोजीच्या लेखी खुलाश्यात तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मे, २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते तक्रार अर्ज दाखल करेपर्यंत म्हणजेच दि.१७/१०/२०१९ पर्यंत थकीत वेतनाची मागणी नमूद केलेली असल्याचे म्हटले आहे.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जात मे २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते तक्रार अर्ज दाखल करेपर्यंत म्हणजेच दि.१७/१०/२०१९ पर्यंत थकीत वेतनाची मागणी नमूद केलेली

असली तरी तक्रारदार यांनी समितीसमोर दि.१७/१०/२०१९ पासून पुढील कालावधीमध्येही महाविद्यालयाकडून वेतन अदा करण्यात आलेले नसल्याचे कथन करून ते मिळण्याची लेखी विनंती केली आहे. तसेच संस्था व महाविद्यालयाने समितीसमोर सादर केलेल्या तक्रारदार यांच्या थकीत वेतनाबाबत वेळोवेळी दिलेल्या तपशीलामध्ये तक्रारदार यांचे मे २०१८ ते दि. ३० जून २०२० पर्यंतचे वेतन थकीत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे तक्रारदार यांचे मे २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते जून २०२० या कालावधीमध्ये वेतन थकीत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब तक्रारदार यांच्या मे २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते जून २०२० या कालावधीमधील थकीत वेतनाची मागणी समितीकडून ग्राहय धरण्यात आलेली आहे.

३. संस्था, महाविद्यालयाकडून तक्रारदार यांच्या सादर करण्यात आलेल्या दि.१३/०८/२०२१ रोजीच्या थकीत वेतनाच्या तपशिलाबाबत तक्रारदार यांनी दि.१३/०८/२०२१ रोजीच्या दिलेल्या लेखी खुलाश्यात थकित पगाराबाबत देय रकमांचा तपशील सादर केला आहे. त्यामध्ये संस्था व महाविद्यालयाने देयक नियमानुसार हिशोब न करता काढले असल्याचे नमूद केले आहे. तसेच तक्रारदार यांनी सादर केलेल्या थकीत वेतनाच्या रक्कमेच्या तपशीलाबाबत कोणतीही पुराव्याची कागदपत्रे सोबत जोडलेली नाहीत.

संस्था, महाविद्यालय तसेच तक्रारदार यांनी थकीत वेतनाच्या एकुण रक्कमेबाबत वेगवेगळे तपशिल समितीसमोर सादर केले. दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर सादर केलेली कागदपत्रे अवलोकनी घेता समिती या निष्कर्षास येते की, संस्था व महाविद्यालयाने समितीसमोर सादर केलेल्या वेतनाच्या तपशिलामध्ये तक्रारदार यांना इतर सहयोगी शिक्षकांच्याप्रमाणे वेतन देण्यात आल्याचे स्पष्ट होते. सबब संस्था व महाविद्यालयाने समितीसमोर सादर केलेल्या दि. १३/०८/२०२१ रोजीच्या थकीत वेतनाच्या तपशीलामध्ये निलंबन कालावधीमध्ये ५० टक्के निर्वाहभत्याऐवजी पूर्ण वेतनाच्या रक्कमेचा समावेश करून येणा-या एकूण रक्कमेतून तक्रारदार यांना थकीत वेतनापोटी अदा करण्यात आलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम तक्रारदार यांना देणे बंधनकारक आहे.

४. संस्था व महाविद्यालयाकडून तक्रारदार यांना मे २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते जुन २०२० पर्यंतच्या कालावधीमधील थकीत वेतनापोटी रू.८,९१,८४५/- इतकी रक्कम अदा करण्यात आली. तसेच तक्रारदार यांच्या उर्वरीत थकीत वेतनाची रक्कम कोरोना महामारीच्या अनुषंगाने महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश कमी झाल्याने आवश्यक तेवढा निधी संस्थेकडे उपलब्ध नाही. संस्थेकडे निधी उपलब्ध झाल्यानंतर तक्रारदार यांना उर्वरीत थकीत रक्कम अदा करण्यात

येईल असे समितीसमोर कथन करण्यात आले. समितीने सदर कोरोना महामारीच्या अनुषंगाने संस्था, महाविद्यालयाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून तसेच संस्था व महाविद्यालयाची विनंती लक्षात घेवून तक्रारदार यांना थकीत वेतनाची उर्वरीत रक्कम देण्याबाबत संस्थेस अनेकवेळा मुदत देण्यात आली. तथापी दिलेल्या मुदतीत संस्था व महाविद्यालय हे तक्रारदार यांच्या थकीत वेतनाची उर्वरीत रक्कम देण्याची कोणतीही कार्यवाही न करता समितीस वेगवेगळी कारणे सांगून दिरंगाई करत असल्याचे तसेच याबाबत कोणतेही सबळ कारण, अथवा माहिती सादर करत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सबब तक्रारदार यांच्या थकीत वेतनाबाबत समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

संस्था व महाविद्यालयाने तक्रारदार यांच्या मे, २०१८, जुन २०१८, ऑगस्ट २०१८, ऑक्टोंबर २०१८ ते जून २०२० या कालावधीतील थकीत पगाराच्या रक्कमेबाबत दि. १३/०८/२०२१ रोजीच्या पत्राने समितीसमोर सादर केलेल्या तपशीलामध्ये निलंबन कालावधीतील ५० टक्के निर्वाह भत्याऐवजी पूर्ण वेतनाच्या रक्कमेचा समावेश करून येणा-या एकूण रक्कमेमधून त्यांना अदा करण्यात आलेली रक्कम वजा करून उर्वरीत रक्कम आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत तात्काळ तक्रारदार यांना अदा करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 03/06/2022

| | |
|---|---|
| **सदस्य**<br>**( डॉ. व्ही. एन.शिंदे )** | **सदस्य**<br>**(श्री. ए.ए. कुलकर्णी)** |
| **सदस्य**<br>**( डॉ.एस.एस.महाजन )** | **सदस्य**<br>**(डॉ.एन.बी.गायकवाड)** |
| **सदस्य सचिव**<br>**(श्रीमती ए.ए.कदम)** | **अध्यक्ष**<br>**( श्री.एस.पी.कुलकर्णी )** |